**जाहिरात तारीखः ०१/१०/२०२१.**
**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीखः १६/१०/२०२१.**

# माळी पदाकरीता जाहिरात

जिल्हा न्यायालय, गडचिरोली या आस्थापनेवरील माळीचे **०१** पदासाठी उमेदवाराची निवड यादी व **०२** उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करणेकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आर.पी.ए.डी.) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पिड पोस्ट) द्वारे माळी या पदाकरीता अर्ज, असे लिफाफ्यावर लिहून प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गडचिरोली (यानंतर ज्यास संक्षेपाकरीता जिल्हा न्यायालय असे संदर्भीत केलेले आहे) यांच्याकडे **दिनांक १६/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** अथवा **त्यापुर्वी** पोहचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

या तारखेनंतर आलेले अर्ज अथवा ईतर मार्गाने पाठविलेले किंवा लिफाफ्यावर **माळी पदाकरीता अर्ज** असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. डाक विभागाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

**माळी**

**निवड यादीसाठी माळी पदाची संख्याः ०१ व प्रतिक्षा यादीसाठी पदसंख्या—०२**

माळी पदाच्या पात्रतेकरीता उमेदवारः

**अर्हता**: अ) शरीर प्रकृतीने सुदृढ व पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी कार्यक्षम असावा.
ब) उमेदवार हा इयत्ता ७ वी उत्तिर्ण असावा.
क) उमेदवाराकडे शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाचा एक वर्षाचा माळी प्रशिक्षणाचा डिप्लोमा (प्रमाणपत्र) तसेच माळी कामाचा अनुभव असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.
ड) दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकुण ०२ पेक्षा जास्त नसावी.

**वयोमर्यादा**: महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५/१०/२०१६ अन्वये खुला/सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे आणि कमाल ४३ वर्षे राहील.

**वेतनस्तर**: एस—१, १५०००—४७६००

## <u>उमेदवारांना सुचना</u>

१) जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या—त्या विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेऊनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीचे वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज त्यांच्या विभाग व कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

२) उमेदवाराने जर निवड प्रक्रीयेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायीक विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांचेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

३) अर्ज ए४ आकाराच्या (A4 Size) एका पांढऱ्या रंगाच्या कागदावर संगणकीत/टंकलिखीत/हस्ताक्षरीत केलेला असावा. या जाहिरातीत दिलेल्या नमुन्याप्रमाणे आणि त्यात दिलेल्या मांडणीप्रमाणे अर्ज करण्यात यावा.

४) उमेदवाराने प्रमाणपत्रे अथवा प्रमाणपत्रांच्या प्रती अर्जास जोडू नयेत.

५) उमेदवाराने त्याचे/तीचे अलीकडचे पासपोर्ट साईजचे २ एकसारखी रंगीत छायाचित्रे, त्यापैकी १ छायाचित्र अर्जावर दिलेल्या जागी लावून त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की, त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि उर्वरीत भाग अर्जावर येईल. तसेच दुसरे छायाचित्र अर्जासोबत संलग्नीत करावे.

६) उमेदवाराने मुलाखतीस उपस्थित होते वेळी मुळ कागदपत्रे जसे:— शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र, जातीचा दाखला, गुणपत्रिका, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र व त्यांच्या छायांकीत प्रती आणि दोन सन्माननिय व्यक्तींनी (नातेवाईक नसलेले) दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचेविरुद्ध कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला चालू नसल्याचे प्रमाणित करावे. तसे न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

७) उमेदवारास मुलाखतीसाठी उपस्थित होतांना कार्यालयाकडून पुरविण्यात येणारे 'लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र' विहीत नमुन्यामध्ये भरुन देणे बंधनकारक राहील.

८) उमेदवाराने स्वत:चा पत्ता लिहीलेले एक पोस्टकार्ड, **<u>रु.५ चे पोस्टाचे तिकीट व स्वत:चा पत्ता लिहीलेला लिफाफा</u>** अर्जासोबत जोडावा.

९) विहीत नमुन्यात नसलेला, स्वाक्षरी नसलेला तसेच अपूर्ण माहिती भरलेला अर्ज रद्द करण्यात येईल.

१०) निवड समिती समान निकष लावून अर्हता/योग्यतेच्या आधारे उमेदवारांची माळी पदासाठी अल्पसुची तयार करेल.

११) माळी या पदासाठी एकूण १५ प्रश्नांची चाळणी परिक्षा ३० गुणांसाठी व १५ मिनीटांची बहुपर्यायी व वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नांची असेल. प्रत्येक प्रश्न हा २ गुणांचा असेल. निकालाअंती पुढील उचीत परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची अल्पसुची तयार करण्यात येईल.

१२) माळी पदाकरीता क्रियाशिलता व स्वच्छता यासाठी पात्र उमेदवारांची १० गुणांची ३० मिनीटांची चाचणी परिक्षा जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे घेण्यात येईल. निकालाअंती प्रत्यक्ष मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची अल्पसुची तयार करण्यात येईल.

..३

१३) उमेदवारांना परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्वत:च्या खर्चाने हजर रहावे लागेल.

१४) सेवाप्रवेश प्रक्रीयेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाच्या सुचना असल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर/संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या उमेदवाराला कळविण्यात येणार नाही.

१५) **या निवड प्रक्रियेचे अनुषंगाने काही बदल/दुरुस्ती करण्याचे तसेच कोणत्याही सुचनेविना सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाचे निवड समितीकडे राहतील.**

**<u>सेवाप्रवेश प्रक्रीयेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेल</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | दिनांक १६/१०/२०२१ | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख |
| २) | दिनांक २१/११/२०२१ | चाळणी परिक्षा (**Screening Test**) व निकाल |
| ३) | दिनांक २२/११/२०२१ | क्रियाशिलता व स्वच्छता चाचणी परिक्षा सकाळी १०.०० ते ०२.०० पर्यंत घेण्यात येईल. या परिक्षेचा निकाल याच दिवशी सायंकाळी ०५.०० वाजता जाहीर करण्यात येईल. |
| ४) | दिनांक २३/११/२०२१ | प्रत्यक्ष मुलाखत |

**<u>अर्ज भरण्यासंबंधी महत्वाच्या सुचना</u>**

१) शैक्षणिक अर्हतेच्या रकान्यामध्ये उमेदवारांनी त्याची/तिची उच्चतम शैक्षणिक अर्हता नमूद करावी व मान्यताप्राप्त विद्यापीठाचा एक वर्षाचा माळी प्रशिक्षण डिप्लोमा (प्रमाणपत्र) असल्यास तसे नमूद करावे.

२) इतर प्रवर्ग रकान्यामध्ये शारिरीकदृष्ट्या अपंग, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, आर्थिकदृष्ट्या मागास, वरिलपैकी कोणतेही नाही— यापैकी उमेदवाराने त्यांचा प्रवर्ग नमूद करावा. एकापेक्षा जास्त प्रवर्ग असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

**<u>टिप</u>**: १) निवड/प्रतिक्षायादी प्रसिद्ध झाल्यापासून फक्त २ वर्षाचे कालावधीपर्यंत वैध राहील.

२) एका लिफाफ्यात फक्त एकाच उमेदवाराचा अर्ज असावा. एकाहून जास्त अर्ज एका लिफाफ्यात असल्यास तसे सर्व अर्ज अग्राह्य ठरतील.

३) लिफाफ्यावर **<u>माळी पदाकरीता अर्ज</u>** असे नमूद करणे गरजेचे आहे.

४) ओळखपत्र असल्याशिवाय चाळणी परिक्षा, क्रियाशिलता व स्वच्छता चाचणी व प्रत्यक्ष मुलाखतीला हजर राहण्यास परवानगी मिळणार नाही.

दिनांक— ३०/०९/२०२१.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.

# माळी या पदाकरीता अर्ज

(टिप: अर्ज भरण्यापुर्वी जाहीरातींमध्ये दिलेल्या सुचना काळजीपुर्वक वाचा)

नुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसहीत

१) अर्जदाराचे नाव : ——————— ——————— ———————

(प्रथम नाव) (पित्याचे/पतीचे नाव) (आडनाव)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोड क्रमांकासह: ————————————————
————————————————
————— पिनकोड —————

३) मूळ पत्ता पिनकोड क्रमांक सहीत: ————————————————
————————————————
————— पिनकोड —————

४) जन्म दिनांक (अंकात): दिनांक__________महिना_________वर्ष___________
(अक्षरात) ————————————————————————

५) जाहीरात प्रसिद्धीचे दिवशी वय: वर्ष________महिना________दिवस_________

६) उमेदवाराचा धर्म ——————— जात ——————— प्रवर्ग ———————

७) लिंग – ————————————————————

८) शैक्षणिक पात्रता— ————————————————————
प्राप्त गुण व टक्केवारी ————————————————————

९) विद्यापीठाचे १ वर्षाचे शासन मान्यताप्राप्त माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र आहे/नाही ———

१०) इतर प्रवर्ग ————————————————————

११) जाहिरातीचे दिनांकास हयात मुलांची संख्या ___________________________

१२) न्यायीक विभागात कार्यरत असलेल्या नातेवाईकांसंबंधी माहिती

| नाव | पदनाम | उमेदवाराशी नाते |
|---|---|---|
| | | |

१३) माळी कामाचा अनुभव आहे/नाही— ———————

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो/करते की, मला शासकीय सेवेकरीता अपात्र घोषीत केलेले नाही, मला फौजदारी गुन्ह्यात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबीत नाही.

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे, त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रीयेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड/नेमणूक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस/सुचना दिल्याविना समाप्त केली जाईल.

———————————

दिनांक— /१०/२०२१ अर्जदाराची सही